# राशिभविष्य - डिसेंबर, २०१४.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

========================================

**(१) मेष -** या राशीच्यामंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. केवळ बुध-गुरू-शुक्राच्या थोड्या फार अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. मात्र लहरी, चंचल स्वभावावर नियंत्रण ठेवावे लागेल. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल, पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीची काही मंडळी स्थावर खरेदी करू शकतील; तर काहींना त्यांच्यामालकीची स्थावर संपत्ती विकावी लागेल. महिन्याचा पूर्वार्ध चिकित्सक बौद्धिक , शैक्षणिक , शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल; तर महिन्याचा उत्तरार्ध शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे सुखकारक होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे अर्थलाभ होईल. पण रवि - शनि हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. त्यात भर म्हणून जीवनसाथीचे व मुलांपैकी कोणाचे आजारपण चिंतित करण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व शिवोपासना मन:शांती देऊ शकेल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नसला तरी उच्च राशीतील गुरुमुळे व महिन्याच्या उत्तरार्धात बुध - शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. मानसिक रोगतज्ञ , द्रव पदार्थ व्यापारी, चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधानात्मक कार्यक्षेत्र असणारांना

काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शक्यतो प्रवास टाळा. प्रावासात त्रास , मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच मित्रांशी वाद, भांडणे होणार नाहीत, याची काळजी घ्या. दलाली, कमिशनवर व्यापार, व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. नोकरदार मंडळी, स्वतंत्र व्यावसायिक यांना अस्थिर परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. स्वत:चे जीवनसाथीचे अनारोग्य, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात बुध-शुक्राच् या अनुकुलतेने नियोजित कार्यात यश मिळेल, काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होईल; तर काहींना धनलाभ वा अन्य प्रकारचे लाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजानन व श्री हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्वच मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व प्रकारे अनुकुल, प्रगतिकारकव लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा कसोशीने प्रयत्न करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. हा काळ दौडाल तर नंतर पश्चात्ताप करावा लागेल. पण अशा प्रयत्नात स्वत:च्या आरोग्या ची काळजी घ्यावी लागेल व सतत सावधानतेने वाटचाल करावी लागेल. उष्णता विकार, शारीरिक-मानसिक कष्ट, अपघात अशापैकी त्रास होणे संभवते. असेच विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. मन व बुद्धी स्थिर, स्वस्थव सकारात्मक राहण्यासाठी आध्यात्मिक उपासना अनुकुल होईल. त्यासाठी काळही अनुकुल आहे. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील तर काहीना प्रदेशगमनाची संधी मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात सतत नम्रतेने आचरण कराल, मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना मूकपणे सहन कराल तरच होणारा मनस्ताप सुसह्य होईल व सर्व प्रकारचे आरोग्यही उत्तम राहू शकेल. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरीच करावी. काही बदल करण्याचा वा नवीन काही सुरू करण्याचा विचारही करू नये. भावी अनुकुल काळात साधावयाच्या गोष्टीसंबंधीच्या योजना आखण्यास हरकत नाही. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अपेक्षितकौटुंबिक सुख, वैवाहिक जीवनातील सुख आणि संततिसुख लाभण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. स्वत: संयमशील व सहनशील होऊन व समजूतदारपणे वागून कसलीहीबाधा होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. तरच परिस्थिती आटोक्यात राहील. तरीही जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे चिंतीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जपा. "वरून कीर्तन आतून तमाशा" असे आचरण महागात पडेल. ज्यांचे भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहेत त्यांनी मतभेदामुळे वा संशयामुळेभागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. साहित्यिक, चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात काळ अनुकुल व लाभदायक होईल. स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करू शकाल. पाण्यापासून धोका असल्याने शक्यतो जलप्रवास करू नका. आळस, नैराश्य, अनारोग्य अशापैकी कारणांनी त्रस्त असणाऱ्या मुलांची काळजी घ्यावी लागेल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाची तर काहीना परदेश प्रवासाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा'चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. आर्थिक चिंता, कौटुंबिक कलह, अनारोग्य अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. म्हणून अहंकारी स्वभावाला काबूत ठेवा, मनावर संयम ठेवा, सहनशील व्हा, आपले विचार, मते प्रकट करू नका. अकारण श्रम, दगदग करू नका. सतत नम्रतेचे आचरण करा. इष्ट देवतेची उपासना करा व अध्यात्म प्रगतीसाठी काळ अनुकुल असल्याने अध्यात्मात मन रामवा. त्यामुळेच बुद्धी व मन स्थिर व शांत राहील व गुरु-शुक्र ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष ठेवा. उष्णता विकारांचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना मुखदंत रोगाचा तर काहीना रक्तदोष, त्वचारोगाचा त्रास होणे संभवते. नोकरदार मंडळीनी वरिष्ठांशी नम्रतेने वागल्यास वरिष्ठांचा त्रास होणार नाही. प्रिय जनापासूनदूरत्व घडण्याची शक्यता जाणवते. असे घडले तर त्यामुळे विरह वेदना त्रस्त करतील. काही मंडळीना संततीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील, तर

काहीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. वस्तू गहाळ होणे, चोरी होणे अशापैकी घटना घडणे शक्य दिसते. जपा. दाम्पत्य जीवनात मतभेद, वाद होणार नाहीत याची काळजीअसल्याने घ्या. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा.

**(६) कन्या -** गेल्या महिन्यापासून या राशीची मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त झाली आहेत. तरीही काळ अपेक्षेनुसार अनुकुल झालेला नाही. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने मात्र काळ अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, शैक्षणिकव्य वसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते अशापैकी नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना अपेक्षेनुसार उत्तम नोकरी मिळणे शक्य दिसते. शेतीवाडी असणारांना अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. उच्च राशीचा गुरु लाभस्थानी असल्यामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षेनुसार प्रगती साधणे शक्य होईल. नवे मित्रसंबंध निर्माण होतील या राशीच्या विवाहेच्छू युवकंयुवतीचे विवाह ठरतील. धनलाभ व वाहनसुख मिळणेही शक्य आहे. असे असले तरी विचारपूर्वक आचरण न केल्यास फसवणूक होणेही संभवते. जपा. तसेच विकृत विचार करू नका. काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना होईल व त्यामुळे नैराश्य येईल. जपा. गृहसौख्यात बाधा निर्माण होणार नाही याकडे लक्ष द्या. तसेच जीवनसाथीच्या लहरी, विक्षिप्त आचरणामुळे, वाद, मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी मतभेद, संशय आदि कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर दररोज नियमाने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्यामंडळीना या महिन्याचा उत्तरार्धचकाही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. पण शनि-मंगळ दोन्ही ग्रहकौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने पूर्णपणे प्रतिकुल असल्याने व सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील झाले असल्यामुळे थोडे जरी मनाविरुद्ध काही घडले तरी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. शनी ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी मन व बुद्धी शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करावा व नम्रतेने आचरण करावे, हे उत्तम. अविचाराने खर्च होणार नाही याची काळजी घ्या. तसेच आर्थिक फसवणूक,

किंवा आर्थिक नुकसान होणे संभवते. शारीरिक- मानसिक आरोग्याकडे लक्ष ठेवा. नेत्रविकार , मेंदूविकार, डोकेदुखी अशा प्रकारचे आजार होणे संभवते. जपा. विविध कारणांनी प्रिय जनात वाद, भांडणे होणे संभवते. जपा. मौन व्रत धारण करा. आध्यात्मिक उपासनेत मन व बुद्धी व्यग्र राखू शकलात तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील, तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. वैवाहिक जीवनातही बाधा येणे संभवते. अशा परिस्थितीतही गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याचा उत्तरार्ध नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होईल चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शैक्षणिक व्यवसाय, शास्त्रीयव गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहीना परदेशगमनाचे योग येतील. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या व कुटुंबियाच्या सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेलसे दिसते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळेसतत मन व बुद्धीवर ताबा ठेवून, वादविवाद टाळून, सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. तसे वागू शकलात तरच गुरु-शुक्राच्याअनु कुलतेमुळे मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद लुटू शकाल. नियोजित कार्यात अडथळे येणे, मनाविरुद्ध घटना घडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावेल. जपा. हृदयविकार, रक्तदाब असे आजार असणारांनी तर विशेषच काळजी घेतली पाहिजे. प्रिय जणांपैकी कोणाचे दूर ठिकाणी स्थलांतर झाले तर गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक नुकसान, आर्थिक फसवणूक अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करील . तसेच गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीनी नोकरीचे ठिकाणी नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, गूढ संशोधन व्यवसाय असणारांना काळ अनुकूल व लाभदायक होईल. अनारोग्य वा नैराश्य अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. श्रीगणेश उपासना अनुकूल होईल.

**(९) धनु -** गेल्या महिन्यापासून या राशीच्या मंडळीना शनी ग्रहाची साडेसाती सुरू झाली आहे. तेव्हा आता यापुढील काळ या राशीच्या मंडळीनी मनावर व विचारांवर ताबा ठेवून, सतत सावध राहून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. तरच गुरु-शुक्राच्या अनुकुलते मुळे मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद व सुख अनुभवणे शक्य होईल. रवि - मंगळ - शनि हे दादा ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे गहरे नैराश्य येणे, शारीरिक - मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. शारीरिक उष्णता भडकून नाक-कान-घसा डोळे यांपैकी कसले तरी अनारोग्य त्रस्त करील जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेषच काळजी घेतली पाहिजे. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने, विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. अस्वस्थ मनस्थिती राहिल्यास कोणाशीच पटणार नाही, आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही. त्या मुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणे अशक्य होईल. जपा. राहूमुळे नोकरदार मंडळीपैकी कोणास अधिकारप्राप्ती तर कोणास संन्मान योग येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरूमुळे या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना असा अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या काहीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशवारीचे योग येतील. अध्यात्मप्रगतीस काळ अनुकुल असल्याने उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमाने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(१०) मकर -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव हटटी, हेकट, मानापमान फार असणारा असा घडला असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळेच अकारण श्रम , दगदग केले जाणे संभवते. त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धाच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. काहीना पगारवाढ, काहीना बढती व अधिकारपद मिळणे संभवते. त्यामुळे आर्थिक लाभही होतील. नवे मित्र , नव्या ओळखी होतील व त्यामुळे अनुकुल व लाभदायक घटना घडतील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्रहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. उच्च व चौकस बुद्धी आणि आकलन - स्मरणशक्ती

असणारांना शास्त्रीय संशोधानातील कठीण कठीण समस्या सोडवणे सहज शक्य होईल. पण त्यासाठी मन व बुद्धी शांत, स्थिर राहण्यासाठी आध्यात्मिक उपासना करणेही आवश्यक होईल. कारण विविध कारणांनी चिंता, मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. कौटुंबिक वाद, भांडणे, मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची अन्य समस्या अशापैकी कारणांनी मनाची एकाग्रता भंग होण्या ची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे विवाहेच्छू युवकयुवतीचे विवाह ठरतील व संपन्न होतील. नवे प्रेमसंबंध , स्नेहसंबंध जुळून येतील. प्रवासयोग येणेही संभवते. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने श्रीहनुमान व श्रीगणेशउपासना करा. दररोज नियमाने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीचे मन सध्या अतिशय कोमल झाले असून मानसिक भावना अति शीघ्र झाल्या असण्याची शक्यता जाणवते. तसेच स्वभाव अस्थिर, चंचल लहरी, धाक, दडपण सहन न होणारा असा घडत असला पाहिजे असेही जाणवते. तसे असेल तर थोड्याशा मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळेही लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. अकारण विचित्र आचरण घडत असेल तर या राशीच्या मंडळीनी मनावर ताबा ठेवून व जिभेला लगाम घालून आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. अविचाराने खर्च होणे संभवते. त्यामुळेच आर्थिक चिंता निर्माण होतील. जपा. पालकांनी या राशीच्या खोडकर, व्रात्य लहान मुलांकडे जातीने विशेष लक्ष देणे आवश्यक होईल. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाउन त्यांचा त्रास सहन कराव लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक असून शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, अधिकार पद, मानाचे स्थान मिळणे संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल, आर्थिक प्रगती होईल. जन्मकुंडलीतील योगानुसार काहीना उलट परिस्थितील तोंड द्यावे लाग्नाची शक्यताही जाणवते. मंगळ -राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. वाममार्ग धनप्राप्तीचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. आरोग्य सुधारेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकूल होईल व स्वस्थता लाभेल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अस्थिर, लहरी, चंचल व गुलहौशी

असा झाला असावा, असे दिसते. त्यामुळे त्यांनी मन व विचारशक्ती स्थिर राखण्याचा कसोशीने प्रयत्न करावा, हे उत्तम. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. कारण अशा कार्यात प्रगतीसाठी काळ अनुकुल व प्रगतिकारक आहे. तसेच गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांनाही काळ प्रगतिकारक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरुमुळे सतत शुभ घटना घडतील. प्रेमसंबंध वाढतील, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिकउच्च प्रगती साधणे शक्य होईल. चिकित्सक उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या बाबतीत मात्र काळ फारसा अनुकुल होईलसे दिसत नाही. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. इच्छाआकांकशा पूर्ण होतील. मोठ्या अधिकारी मंडळीच्या ओळखीतून काही लाभदायक घटना घडतील. सामान्य नोकरी असणारांना मात्र कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ होणे संभवते. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान गोष्टीचा लाभ होणेही शक्य दिसते. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे मन व बुद्धी विकृत होणे शक्य आहे जपा. काहीना वाईट मार्गाने प्र सिद्धी मिळणेही संभवते. जपा. तसेच वैवाहिक सुखातही बाधा येणे संभवते. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====OOO0OOO=====